**शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता नवीन महाविद्यालयास इरादापत्र देणेबाबत.**
**(न्यायालयीन प्रकरण)**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्र. मान्यता-२०२४/ई- ८११२१२/मशि-४**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: २४ एप्रिल, २०२६

**संदर्भ**:-१. शासन निर्णय क्र. HTED-२९०६६(११)/१/२०२४/७३०८९०-MHT-(HE-४), दिनांक १५.०२.२०२४.
२. शासन निर्णय क्र HTED-२९०६६(११)/१२/२०२४/ई- ८११२१२-MHT-(HE-४), दिनांक १७.०४.२०२५.
३. मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे दाखल याचिका क्र. ६१४५/२०२५ मधील मा. न्यायालयाचे दिनांक ०४.१२.२०२५ रोजीचे आदेश

**प्रस्तावना:-**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता बोधीसत्व बहुउद्देशीय शिक्षण संस्था, वाशिम द्वारा संचलित दुर्गाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाडेगांव, ता. बाळापूर, जि. अकोला या संस्थेस 'वाडेगांव, ता. बाळापूर, जि. अकोला' या बिंदूकरिता संदर्भाधिन क्र.१ येथील शासन निर्णय दि.१५.०२.२०२४ अन्वये इरादापत्र प्रदान करण्यात आले होते. सदर प्रदान केलेले इरादापत्र संदर्भाधिन क्र.२ येथील शासन निर्णय दिनांक १७.०४.२०२५ अन्वये रद्द करण्यात आले आहे. सबब, 'वाडेगांव, ता. बाळापूर, जि. अकोला' या बिंदूकरिता अन्य संस्थेला देण्यात आलेले इरादापत्र रद्द करण्यात आल्याने, सदर बिंदूकरिता प्रस्तावित महाविद्यालयास इरादापत्र मिळणेबाबत शिक्षण प्रसारक मंडळ, वाडेगाव, ता. बाळापूर, जि. अकोला या संस्थेने मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्रमांक ६१४५/२०२५ दाखल केली आहे. सदर याचिकेत मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी दिनांक ०४.१२.२०२५ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरून, शिक्षण प्रसारक मंडळ, वाडेगाव, ता. बाळापूर, जि. अकोला या संस्थेस इरादापत्र प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

याचिका क्र. ६१४५/२०२५ या न्यायालयीन प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिनांक ०४.१२.२०२५ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरून, 'वाडेगाव, ता. बाळापूर, जि. अकोला' या बिंदू करिता याचिकादार शिक्षण प्रसारक मंडळ, वाडेगाव, ता. बाळापूर, जि. अकोला संस्था संचलित श्री. जागेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाडेगांव, ता. बाळापूर, जि. अकोला या नवीन प्रस्तावित महाविद्यालयास खालील विवरणपत्रात नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (३) (घ) मधील तरतुदीनुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ पासून खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून कायम विना अनुदान तत्वावर इरादापत्र मंजूर करण्यात येत आहे. सदरहू इरादापत्रास मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथे दाखल याचिका क्र. ३३१४/२०२५ मधील अंतिम न्यायानिर्णयाच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे :-

| **संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती** | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **संस्थेचे व महाविद्यालयाचे नाव** | **अभ्यासक्रम** |
| १. | शिक्षण प्रसारक मंडळ, वाडेगांव, ता. बाळापूर, जि. अकोला संचलित, श्री. जागेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाडेगांव, ता. बाळापूर, जि. अकोला | बी.ए. (मानव विज्ञान विद्याशाखा),<br>बी.कॉम. (वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा),<br>बी.एस्सी. (विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा). |

**२. अटी व शर्ती:-**

उपरोक्त इरादापत्रांकरीता पुढीलप्रमाणे **अटी व शर्ती** लागू राहतील :-

१) शासनाच्या प्रचलित धोरणानुसार नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी देण्यात येणारे इरादापत्र हे **कायम विनाअनुदानित तत्वावर** महाविद्यालय सुरु करण्यासाठी राहील.

२) सदर इरादापत्र हे संस्थेने नवीन महाविद्यालयास अंतिम मान्यता प्राप्त करण्यापूर्वी विहित अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या दृष्टीने दिलेले असल्याने, या इरादापत्रामुळे संस्थेस नवीन महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची अंतिम मान्यता प्राप्त झाल्याशिवाय महाविद्यालय सुरु करता येणार नाही.

